मध्यप्रदेशातील चौराई येथील धरणामुळे महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पाच्या पाणीसाठयात व सिंचनात झालेल्या घटीमुळे उद्भवलेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी करावयाच्या दुष्काळ निवारण उपाययोजनांतर्गत कन्हान नदीवरील सिहोरा उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्र. एससीवाय-२०१९/प्र.क्र.१६४/म-७

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक : २६ जूलै, २०१९

<u>संदर्भ</u> :- १) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/(५४१/१७)/ सिंव्य (कामे), दि.३०/०५/२०१८

२) शासन निर्णय,महसूल व वन विभाग,क्र.एससीवाय-०४/२०१८/प्र.क्र.३१/म-११, दि.३१ जुलै, २०१८

३) शासन निर्णय,महसूल व वन विभाग,क्र.एससीवाय-२०१८/ प्र.क्र.११७ /म-७, दि.१ मार्च, २०१९

४) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. २२४/ विपाविम/का.तां.६(१)/धा.क्र. सिहोरा उसिंयो/२०१९, दि.०५/०१/२०१९

<u>प्रस्तावना</u> :-

मध्यप्रदेश शासनाने पेंच नदीवर चौराई येथे धरण बांधले आहे. चौराई धरण होईपर्यंत मागील २८ वर्षापासून तोतलाडोह येथे उपलब्ध होणारे सर्व पाणी वापरण्यात येत होते. त्यातून नागपूर शहरासाठी पाणी पुरवठा योजना व सिंचनासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होत होते. मध्यप्रदेशातील चौराई धरणाच्या बांधकामामुळे पेंच जलविद्युत प्रकल्प व तोतलाडोह धरणात येणाऱ्या येव्यात घट झाल्याने तोतलाडोह धरणाच्या पाणीसाठयात व सिंचनात लक्षणीय घट संभवत आहे.

२. या पार्श्वभूमीवर मध्यप्रदेशातील चौराई येथील धरणामुळे महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पाच्या पाणीसाठयात व सिंचनात झालेल्या घटीमुळे उद,भवलेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांना मा.मंत्रीमंडळाने दि.२२/०३/२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने जलसंपदा विभागाने उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णय निर्गमित केला असून त्याद्वारे पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तीन भागांतर्गत करावयाच्या अंदाजीत रूपये १०१५ कोटी किमतीच्या उपाययोजनांना दुष्काळ निवारण कार्यक्रमांतर्गत तत्वत: मान्यता दिलेली आहे.

३. तसेच महसूल व वन विभागाकडून उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये नवीन लेखाशिर्ष उघडण्यात आले आहे. तसेच महसूल व वन विभागाने उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ येथील शासन निर्णयान्वये मध्यप्रदेशातील चौराई येथील धरणामुळे महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पाच्या पाणीसाठयात व सिंचनात झालेल्या घटीमुळे उद्भवलेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी तीन भागांतर्गत करावयाच्या अंदाजीत रूपये १०१५ कोटी किमतीच्या उपाययोजनांना दुष्काळ निवारण कार्यक्रमांतर्गत तत्वत: प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. तसेच या उपाययोजनांसाठी आवश्यक असणारे अनुदान जलसंपदा विभागाच्या मागणीनुसार मदत व पुनर्वसन विभागाकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

४. या पार्श्वभूमीवर उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या महामंडळाच्या पत्रानुसार प्रस्तावित केलेले व राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र क्र.रातांसस (१)/सिहोरा उसिंयो / (धा.क्र.७४/२०१८)/१३८९/२०१८, दि.२९/१२/२०१८ अन्वये सविस्तर प्रकल्प अहवालास प्राप्त अनुमती (Clearance) च्या अनुषंगाने सिहोरा येथे पेंच प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरील एल- ४ शाखा कालव्याच्या किमी २ जवळ कन्हान नदीवर बंधारा बांधून कालव्यात उपसाद्वारे पाणी सोडणेबाबतच्या सिहोरा उपसा सिंचन योजना, ता.कामठी, जि.नागपूर या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u> :-

संदर्भाधीन क्रमांक ३ येथील शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२. मध्यप्रदेशातील चौराई येथील धरणामुळे महाराष्ट्रातील पेंच प्रकल्पाच्या पाणीसाठयात व सिंचनात झालेल्या घटीमुळे उद्भवलेल्या पाणी टंचाईवर मात करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांपैकी ***सिहोरा येथे पेंच प्रकल्पाच्या उजव्या कालव्यावरील एल- ४ शाखा कालव्याच्या किमी २ जवळ कन्हान नदीवर बंधारा बांधून कालव्यात उपसाद्वारे पाणी सोडणेबाबतच्या सिहोरा उपसा सिंचन योजना, ता.कामठी, जि.नागपूर या प्रकल्पाच्या रू.१३२.९० कोटी किमतीच्या अंदाजपत्रकास*** खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

१) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र क्र.रातांसस (१)/सिहोरा उसिंयो/(धा.क्र.७४/२०१८)/१३८९/२०१८, दि.२९/१२/२०१८ अन्वये सादर केलेल्या छाननी अहवालात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची पूर्तता महामंडळस्तरावर करण्यात यावी.
२) प्रस्तावित योजनांसाठी आवश्यक सर्व वैधानिक मान्यता जसे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील तरतूदीनुसार आवश्यक मान्यता, पर्यावरण व वन विभागाची मान्यता, केंद्रीय जल आयोग मान्यता व इतर आवश्यक पूर्वमान्यता घेण्याची जबाबदारी महामंडळाची राहील.

३) उपरोक्त १) व २) येथील अटी, शर्ती व वैधानिक मान्यतांची पूर्तता झाल्याशिवाय या उपाययोजनेंतर्गतच्या कामांच्या निविदांचे कार्यारंभ आदेश देण्यात येऊ नयेत.

४) कामाचा खर्च उपलब्ध अनुदानातून प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच करून सदर काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यात यावे.

५) सदरच्या कामाचा कार्यारंभ आदेश काढण्यापासून कामे पूर्ण होईपर्यंत त्रैमासिक प्रगती अहवाल शासनास सादर करावा. काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा पूर्णत्व अहवाल व आवश्यक प्रमाणपत्रे शासनास त्वरीत उपलब्ध करून द्यावीत.

३. या कामावर होणारा खर्च मागणी क्र.सी-९, प्रधान लेखाशिर्ष-४२५०, इतर सामाजिक सेवावरील भांडवली खर्च, (००), इतर सामाजिक सेवावरील भांडवली खर्च, १०१ नैसर्गिक आपत्ती, (००) (०५) दुष्काळ प्रतिबंधक उपाययोजना या अंतर्गत नागपूर विभागात उद्भवलेल्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी उपसा सिंचन विषयक योजना (कार्यक्रम), ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेतर), संगणक संकेतांक क्रमांक (4250A043) या मुख्य लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात यावा.

४. जलसंपदा विभागाने त्यांचेकडील स्थायी धोरणानुसार या कामासाठी निधीची आवश्यकता उदभवल्यानंतर निधीची मागणी या विभागाकडे करावी. तदनंतर या विभागाकडून निधी उपलब्ध करून दिल्यानंतर सदर निधी अंमलबजावणी यंत्रणेकडे सुपूर्द करावा.

५. सदर योजना पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल, दुरूस्ती व इतर व्यवस्थापन विषयक बाबी जलसंपदा विभागाकडून हाताळल्या जातील.

६. उपरोक्त योजनेचे काम करत असतांना शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके व अधिनियम यांचे अनुपालन काटेकोरपणे करण्याची दक्षता संबंधित महामंडळ व क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी घ्यावी.

७. सदर प्रशासकीय मान्यता जरी मदत व पुनर्वसन विभागाकडून देण्यात येत असली तरी योजनेची अंमलबजावणी व सनियंत्रण जलसंपदा विभागाकडून करण्यात येणार असल्यामुळे, नियमातील तरतुदीनुसार कोटेकोरपणे लेखापरीक्षण करण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची राहील. तसेच यानुषंगाने विधीमंडळविषयक, महालेखापाल यांचे लेखापरीक्षण, लोकलेखा समिती विषयक, न्यायालयीन प्रकरणे वा इतर कोणत्याही स्वरुपाचे कामकाज पुर्णत: जलसंपदा विभागाकडून हाताळण्यात येईल.

८. सदर शासन निर्णय जलसंपदा विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक: ६९/२०१९/व्यय-१२,दिनांक १२.३.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०७२६१३०९१४६९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Subhash Hanmant
Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department,
postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024
,
serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4
db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2019.07.26 13:19:08 +05'30'

(सु. ह. उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष, विधानसभा, विधानभवन, मुंबई
४) मा.सभापती/उपसभापती, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
५) मा.विरोधी पक्षनेते, विधानसभा, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
६) मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद, मुंबई यांचे कार्यालय, विधानभवन, मुंबई,
७) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८) सचिव (मदत व पुनवर्सन), मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
१४) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
१५) वित्तिय सल्लागार व सहसचिव , मदत व पुनर्वसन,नवीन प्रशासन भवन,मुंबई
१६) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
१७) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर,
१८) आंतरवित्त सल्लागार व उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण मंडळ, नागपूर
२०) कार्यकारी अभियंता, पेंच पाटबंधारे विभाग, नागपूर,
२१) कार्यासन (ब-१), महसुल व वन विभाग,मंत्रालय
२२) निवड नस्ती (कार्यासन-म-७).

शासन निर्णय,महसुल व वन विभाग, क्रमांक एससीवाय-२०१९/प्र.क्र.१६४/म-७, दिनांक: २६ जूलै, २०१९ चे परिशिष्ट

Sr. No	**Particulars**	**Rs in Lakhs**		
		Unit-I	**Unit-II**	**Total**
1	A Preliminary	75.391	0.00	75.391
2	B-Land	69.925	0.00	69.925
3	C-Works	5846.289	0.00	5846.289
4	D-Regulator	0.00	0.00	0.00
5	E-falls	0.00	0.00	0.00
6	F-FRHT Works	0.00	0.00	0.00
7	G-Bridges	0.00	0.00	0.00
8	H-Escapes	0.00	0.00	0.00
9	K-Buildings	0.00	0.00	0.00
10	E-Earth Works	0.00	0.00	0.00
11	M-Plantation	5.846	0.00	5.846
12	O-Miscellaneous	233.852	0.00	233.852
13	P-Maintenance	58.586	0.00	58.586
14	Q-Special T&P	0.00	0.00	0.00
15	R-Communication	6.969	0.00	6.969
16	X-Environment and Ecology	35.195	0.00	35.195
17	**TOTAL**	6332.052	0.00	6332.052
18	III-Distribution (PDN)	0.00	5774.297	5774.297
	TOTAL COST	**6332.052**	**5774.297**	**12106.349**

	Direct Charges: (1)			
1	Losses on Stock@ 0.25% (excluding A and B & Q)	15.467	14.436	29.903
2	Establishment Charges 8% excluding B land of I head works	500.970	461.944	962.914
3	Leave and Pensionary Charges 0.25% of Establishment charges	1.252	1.155	2.407
4	Ordinary T&P 1% of HW excluding B land	62.621	0.00	62.621
5	**TOTAL DIRECT Charges (1)**	**580.311**	**477.534**	**1057.845**
	Deduct Receipts and recoveries due to			
1	Resale value 75% of Q-T&P excluding personal carriers	0.00	0.00	0.00
2	20% of personal carriers on Q-T&P	0.00	0.00	0.00
3	Salvage value of temporary buildings @15%	0.00	0.00	0.00
4	**NET DIRECT Charges (I)**	**580.311**	**477.534**	**1057.845**
	Indirect Charges			
1	abetment land revenue 5% of culturable land on 64.35 lakh	3.218	0.00	3.218
2	Audit and accounts 1% on total cost excluding B- Land	62.621	57.743	120.364
3	Secretariat Charges 0.25% of Establishment charges	1.252	1.155	2.407
4	**Total Indirect Charges (II)**	67.091	58.898	125.989
5	**Grand Total (I+II)**	647.402	536.432	1183.834
	TOTAL COST OF PROJECT	**6979.454**	**6310.729**	**13290.183**